शनिवार
१० ऑक्टोबर २०२६

वर्ष १९ वे
अंक - २४५
पाने - ०६
किंमत - ४ रूपये

- Web : www.yuvavarta.in/com
- Mail : dailyyuvavarta@gmail.com

# दैनिक युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

संपादिका : सौ. सुशीला किसन हासे (बी. ए.)
संस्थापक : किसन भाऊ हासे (बी. जे.)
कार्यकारी संपादक : सुदीप किसन हासे (एम.ई.)

- RNI No. MAHMAR/2007/24252

पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25



## चंदनापुरी घाटात कारचा भीषण अपघात, युवतीचा मृत्यू

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील संगमनेर तालुक्यातील चंदनापुरी घाटात गुरुवारी दुपारी इर्टिका कारचा भीषण अपघात झाला. भरधाव कार रस्ता दुभाजकाला धडकून पलटी झाल्याने कर्नाटकातील २४ वर्षीय युवतीचा जागीच मृत्यू झाला, तर कारमधील अन्य चार जण गंभीर जखमी झाले. या अपघातात कारचे मोठे नुकसान झाले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कर्नाटकातील होन्नाली आणि नाईक कुटुंबातील सदस्य इर्टिका कारने (क्र. घ- २९ इ ८७७७) पुण्याहून नाशिकच्या दिशेने प्रवास करत होते. गुरुवारी दुपारी चंदनापुरी घाटात प्रवेश करताच चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले. त्यामुळे भरधाव कार थेट रस्ता दुभाजकाला धडकली. त्यानंतर कार पलटी होऊन रस्त्याच्या कडेला असलेल्या साईड गटारात कोसळली. अपघाताची तीव्रता इतकी होती की कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

या अपघातात अर्पिता भीमआप्पा नाईक (वय २४, रा. मुदलगी, जि. बेळगाव, कर्नाटक) या युवतीचा जागीच मृत्यू झाला. तर रोहन होन्नाली, अभिषेक नाईक, सुरज होन्नाली आणि बसय्या नेलुर हे चार जण गंभीर जखमी झाले आहेत. अपघाताची माहिती मिळताच डोळासणे महामार्ग पोलीस केंद्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रावसाहेब बांबळे आणि पोलीस कर्मचारी अजय आठरे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. महामार्ग पोलिसांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने बचावकार्य राबवून कारमध्ये अडकलेल्या जखमींना बाहेर काढले. त्यानंतर त्यांना उपचारासाठी संगमनेर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मृत अर्पिता नाईक हिचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी संगमनेर येथील कुटीर रुग्णालयात पाठवण्यात आला. दरम्यान, अपघातामुळे महामार्गावरील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली होती. पोलिसांनी क्रेनच्या साहाय्याने अपघातग्रस्त कार बाजूला केल्यानंतर वाहतूक पूर्ववत सुरू झाली.

# समता पतसंस्थेला एनसीडीसीकडून १०० कोटींचा निधी

## गुणवत्तापूर्ण कामकाजाची केंद्र शासनाकडून दखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

कोपरगाव - भारतातील सहकारी संस्थांच्या व्यवसायवाढीसाठी मार्गदर्शन करण्याबरोबरच त्यांना निधी उपलब्ध करून देणाऱ्या भारतीय राष्ट्रीय सहकार विकास निगम (एनसीडीसी) यांच्या माध्यमातून समता नागरी सहकारी पतसंस्थेला १०० कोटी रुपयांच्या निधी मंजुरीचे पत्र राष्ट्रीय सहकार विकास निगम, पुणेचे रिजनल डायरेक्टर गिरीराज अग्निहोत्री यांच्या शुभहस्ते संस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे यांच्या कडे संचालक मंडळाच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आले.

यावेळी अधिक माहिती देताना संस्थेचे संचालक संदीप कोयटे म्हणाले की, गुणवत्तेच्या निकषांवर सहकारी संस्थांची तपासणी करून केंद्र शासनाच्या राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून हा निधी उपलब्ध करून दिला जातो. समता पतसंस्थेला मंजूर झालेल्या या निधीचा विशेषतः सोनेतारण कर्ज वाटपासाठी उपयोग केला जाणार आहे.

समता पतसंस्थेने गेल्या ४० वर्षांत केलेली गुणवत्तापूर्ण व्यवसायवाढ तसेच महाराष्ट्रातील इतर सहकारी पतसंस्थांना दिलेले मार्गदर्शन यामुळे समताला मिळालेला हा निधी इतर सहकारी संस्थांसाठीही मार्गदर्शक ठरेल, असे गिरीराज अग्निहोत्री यांनी सांगितले. समताचा आदर्श घेऊन इतर पतसंस्थांनीही गुणवत्तापूर्ण व्यवसायवाढीसाठी प्रयत्न करावेत आणि देशभरात सहकार क्षेत्राच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

संस्थेचे व्हा. चेअरमन अरविंदभाई पटेल म्हणाले की, समताची कठोर थकबाकी वसुली, विशेषतः गेल्या तीन वर्षांत सोनेतारण कर्जवाटपात झालेली लक्षणीय वाढ आणि ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास या बाबींमुळे हा निधी संस्थेला प्राप्त झाला आहे. या निधीचा उपयोग संस्थेच्या प्रगतीसाठी करून समताला आणखी उंचीवर नेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

समता पतसंस्थेच्या गुणवत्तापूर्ण कामकाजाबरोबरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि संस्थेच्या सामाजिक कार्याचेही गिरीराज अग्निहोत्री यांनी कौतुक केले. समताने राबविलेली समता लिक्विडिटी बेस्ड प्रोटेक्शन स्कीम, वसुली पॅटर्न, कॉल सेंटर, फॉरेन्सिक ऑडिट कंट्रोल रूम, समता सहकार उद्योग मंदिर आणि व्हाऊचरलेस बँकिंग प्रणाली याबाबत त्यांनी माहिती घेतली. अशा प्रकारचे उपक्रम इतर सहकारी संस्थांनीही राबवावेत यासाठी राष्ट्रीय सहकार विकास निगम प्रयत्न करेल, असे त्यांनी सांगितले.

समता नागरी सहकारी पतसंस्था सहकार क्षेत्रात करीत असलेले काम महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून देशातील सहकार क्षेत्रासाठी दिशादर्शक ठरत असल्याचेही अग्निहोत्री यांनी नमूद केले. सर्वसामान्य जनतेला सहकारी संस्थांच्या माध्यमातून आर्थिक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या समताच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.

संस्थेचे सरव्यवस्थापक सचिन भट्टड म्हणाले की, या निधीचा उपयोग सहकाराचे नाव उज्ज्वल करण्याबरोबरच इतर सहकारी संस्थांच्या वाढीसाठीही केला जाईल. गेल्या ४० वर्षांत समताने ग्राहकांचा विश्वास संपादन केला असून, केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय सहकार विकास निगमकडून मिळालेला निधी हा त्या विश्वासाला मिळालेली महत्त्वाची पावती आहे.

महाराष्ट्रातील सहकारी पतसंस्था शेतकऱ्यांना कमी व्याजदरात सोनेतारण कर्ज उपलब्ध करून देत असल्याने खासगी फायनान्स कंपन्यांकडून होणारी शेतकऱ्यांची आर्थिक लूट थांबण्यास मदत होत आहे. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांना कमीत कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध करून देण्याचा संस्थेचा प्रयत्न असल्याची माहिती समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा कोयटे यांनी दिली.

यावेळी समता पतसंस्थेचे चेअरमन ओमप्रकाश दादाप्पा तथा काका कोयटे, व्हा. चेअरमन अरविंद पटेल, ज्येष्ठ संचालक जितुभाई शहा, कचरू मोकळ, संचालक संदीप कोयटे, दीपक अग्रवाल, गिरीश सोनेकर, संचालिका श्वेता अजमेरा, अक्षरा पटेल, स्वाती कोयटे, समता महिला बचत गटाच्या अध्यक्षा सुहासिनी कोयटे, जनरल मॅनेजर सचिन भट्टड तसेच मुख्य कार्यालयातील अधिकारी उपस्थित होते.

### सहकार बास्केट'मधून मिनी अॅमेझॉन उभारणार

**काका कोयटे यांच्या मार्गदर्शनाखाली समता पतसंस्था लवकरच महाराष्ट्रात 'सहकार बास्केट'च्या माध्यमातून मिनी मेझॉन उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. हा उपक्रम राष्ट्रीय सहकार विकास निगमामार्फत संपूर्ण भारतभर राबविण्यात येणार असल्याचे गिरीराज अग्निहोत्री यांनी सांगितले.**

# ग्रामविकास परिषदेसाठी जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली नियोजन बैठक

## सोलापूर जि.प.चे उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांना बैठकीचे निमंत्रण



**'एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट' आयोजित 'महाराष्ट्र ग्रामविकास परिषद,दिल्ली' च्या नियोजन बैठकीसाठी सोलापूर जिप उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांना निमंत्रित करताना योगेश पाटील, विकास जाधव,आशिष क्षीरसागर, कैलास गोरे व प्रवीणसिंह देशमुख समवेत जिल्हा परिषद सदस्य अदिनाथ देशमुख,'राष्ट्रीय सरपंच संसदे'चे पदाधिकारी बाळासाहेब नरुटे, अशिष क्षीरसागर, शिवानंद बंदे, विकास माने, आप्पा सगरे, विवेक माने व विकास साळूंखे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

सोलापूर - 'एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट' अंतर्गत 'राष्ट्रीय सरपंच संसद' आणि 'राष्ट्रीय जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य असोसिएशन' यांच्या नियोजन सहकार्याने दिल्ली येथे 'महाराष्ट्र राज्य ग्रामविकास परिषद' आयोजित करण्यात येणार आहे. केंद्र शासनाशी संबंधित महाराष्ट्रातील ग्रामविकास आणि पंचायतराज विभागाच्या विविध प्रश्नांवर चर्चा करून त्यांच्या निराकरणासाठी ठोस उपाययोजना सुचविणे हा या परिषदेचा प्रमुख उद्देश आहे.

या परिषदेत महाराष्ट्रातील ग्रामविकासाशी संबंधित समस्या, प्रलंबित प्रश्न आणि महत्त्वाच्या विषयांचे अभ्यासपूर्ण सादरीकरण केंद्रीय मंत्र्यांसमोर करण्यात येणार आहे. या माध्यमातून राज्यातील ग्रामीण भागाच्या विकासाला गती देण्यासाठी केंद्र शासनाकडून आवश्यक सहकार्य आणि उपाययोजना मिळविण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

दिल्ली येथे होणाऱ्या या परिषदेसाठी महाराष्ट्राचे ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, राज्यातील १४ जिल्हा परिषदांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष, निवडक सरपंच आणि राष्ट्रीय सरपंच संसदेचे पदाधिकारी यांना निमंत्रित करण्यात येणार आहे. परिषदेच्या नियोजनासाठी आणि केंद्रीय मंत्र्यांना सादर करण्यात येणारे निवेदन अभ्यासपूर्ण पद्धतीने तयार करण्यासाठी प्रथम पुणे येथील एमआयटीमध्ये नियोजन बैठक आयोजित करण्यात येणार आहे. महाराष्ट्राचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे प्रणेते डॉ. राहुल कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक होणार आहे.

या पार्श्वभूमीवर मंगळवार, ६ ऑक्टोबर २०२६ रोजी सोलापूर जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांची सोलापूर येथील जिल्हा परिषद कार्यालयात भेट घेऊन त्यांना नियोजन बैठकीचे निमंत्रण देण्यात आले. यावेळी दिल्ली येथे आयोजित करण्यात येणाऱ्या ग्रामविकास परिषदेच्या उद्देशाबाबत आणि नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

राष्ट्रीय सरपंच संसदेचे कार्याध्यक्ष व प्रमुख समन्वयक योगेश पाटील, महाराष्ट्र राज्य समन्वयक ड. विकास जाधव, सोलापूर जिल्हाध्यक्ष आशिष क्षीरसागर, राष्ट्रीय जिल्हा परिषद सदस्य असोसिएशनचे कैलास गोरे आणि सोलापूर जिल्हा समन्वयक प्रवीणसिंह देशमुख यांनी उपाध्यक्ष इंद्रजित पवार यांची भेट घेतली. या वेळी राष्ट्रीय सरपंच संसदेचे पदाधिकारी अदिनाथ देशमुख, बाळासाहेब नरुटे, शिवानंद बंदे, विकास माने, आप्पा सगरे, विवेक माने आणि विकास साळूंखे उपस्थित होते. या नियोजन बैठकीतून महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील प्रश्नांना केंद्र शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी दिशा निश्चित केली जाणार असून, ग्रामविकासाच्या विविध विषयांवर ठोस उपाययोजना सुचविण्याच्या दृष्टीने पुढील कार्यवाही केली जाणार आहे.

# पर्यावरण संवर्धनासाठी संस्कार आणि अध्यात्माची जोड आवश्यक – प्रा. राऊत



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपणाबरोबरच संस्कार, संतविचार आणि सर्व जीवांविषयी भूतदया आचरणात आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन साई-दीप एज्युकेशन, कोतुळचे संचालक प्रा. दीपक राऊत यांनी केले. वनपरिक्षेत्र अधिकारी डी. डी. पडवळे यांच्या मार्गदर्शनाखाली राजूर वनविभागाच्या वतीने एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूल व पीआरटीसी, मवेशी येथे जागतिक प्राणी दिन सप्ताहानिमित्त या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'पर्यावरण संवर्धन : काळाची गरज, संस्कारांची जबाबदारी आणि अध्यात्माची दिशा' या विषयावर बोलताना त्यांनी संत तुकाराम महाराजांचे वृक्षवल्ली आम्हा सोयरे, वनचरे आणि संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पसायदानातील भूता परस्परे पडो, मैत्र जीवांचे या विचारांसह संतपरंपरा, आदिवासी बांधवांचे निसर्गाशी नाते आणि जादव पायेंग यांच्या जंगलाचे उदाहरण दिले. 'पक पक पकाक' चित्रपटातील भुत्या-चिखलूंचा संदर्भ देत प्रत्यक्ष जीवनात भूतदया व पर्यावरण रक्षणाची भूमिका साकारण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात प्रतिसाद दिला.

यंदा लावलेल्या झाडांचा पुढील वर्षी वाढदिवस साजरा करण्याचे आवाहन करत त्यांनी झाड लावणे ही सुरुवात; ते जगवणे ही खरी जबाबदारी, असा संदेश दिला. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले तसेच पर्यावरणप्रेमी राहुल राऊत यांचा वाढदिवस वृक्ष भेट देऊन साजरा करण्यात आला.

कार्यक्रमास एकलव्य मॉडेल रेसिडेन्सियल स्कूलचे प्राचार्य देवानंद थुल, पीआरटीसीचे बांबळे सर, वनविभागाचे अधिकारी-कर्मचारी, शिक्षकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते. राहुल राऊत यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली. आभार वनपाल आर. एन. घोडसरे यांनी मानले.

# ट्रम्प यांच्या व्हिसा धोरणाचा भारतीय IT क्षेत्राला फटका ?

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

डोनाल्ड ट्रम्प तर भारत आणि भारतीय कंपन्यांमागे हात धुवून लागले आहेत. कधी टॅरिफ, तर कधी रशियन तेलावरून अमेरिकेतील ट्रम्प प्रशासन भारताला सतत टार्गेट करत आले असून अमेरिकेत स्थायिक होण्याचे आणि 'अमेरिकन ड्रीम' साकारण्याचे स्वप्न पाहणाऱ्या हजारो भारतीय खढ व्यावसायिकांना ट्रम्प प्रशासनाने मोठा धक्का दिला आहे. अमेरिकी सरकारने परदेशी कामगारांसाठीच्या ग्रीन कार्ड प्रक्रियेचा भाग असलेल्या झएठच् कार्यक्रमातून ८ कंपन्यांना निलंबित केले आहे.टीसीएस, इन्फोसिस, विप्रो, कउङ टेक्नॉलॉजीज, कॉग्निझंट, मायक्रोसॉफ्ट, कॅपजेमिनी आणि अडोब या दिग्गज आयटी कंपन्यांना झएठच् योजनेतून निलंबित केले आहेत. पण परमनंट लेबर सर्टिफिकेशन म्हणजे काय, ट्रम्प प्रशासनाने हा कार्यक्रम का स्थगित केला आणि या निर्णयाचा भारतीय आयटी कंपन्या व कर्मचाऱ्यांवर काय परिणाम होईल, जाणून घेऊया.अमेरिकेच्या कामगार विभागाने या आठ कंपन्यांवर एच-१बी व्हिसा प्रणालीचा गैरवापर केल्याचा आणि व्हिसा घोटाळा केल्याचा आरोप लावून कायमस्वरूपी कामगार प्रमाणपत्र निलंबित केले. या कंपन्या परदेशी नागरिकांना नोकरीवर ठेवण्यास प्राधान्य देतात आणि अमेरिकन नागरिकांना रोजगाराच्या संधींपासून वंचित ठेवत असल्याचा ट्रम्प प्रशासनाने दावा केला. मात्र, तज्ञांचे मत वेगळे आहे. अमेरिकेत सध्या ट्रम्प यांची स्थिती प्रतिकूल असल्याचे अनेकांचे मत असून मध्यावधी निवडणुका जवळ येत असल्याने त्यांचे समर्थक त्यांच्यावर नाराज आहेत आणि आता आयटी कंपन्यांना लक्ष्य करून स्वस्त प्रसिद्धी मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत.

# पोदार इंटरनॅशनल स्कूलच्या प्राचार्या मीनाक्षी मिश्रा यांना 'अहिल्यानगरमधील सर्वोत्कृष्ट प्राचार्य' पुरस्कार




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा यांना Star Education Awards २०२६ मध्ये "The Best Principal in CBSE School Ahilyanagar' या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी नेस्को सेंटर येथे आयोजित पुरस्कार सोहळ्यात त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत हा सन्मान प्रदान करण्यात आला. ESFE यांच्या वतीने आणि ढहश ढळाशीेष खपवळर यांच्या सहयोगाने या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

सौ. मीनाक्षी मिश्रा यांनी आपल्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वातून, प्रभावी नियोजनातून आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य देणाऱ्या कार्यपद्धतीतून पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या प्रगतीत मोलाचे योगदान दिले आहे. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, शिक्षकांना योग्य मार्गदर्शन, विविध शैक्षणिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी आणि शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेत सातत्याने सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न महत्त्वपूर्ण ठरले आहेत.

त्यांच्या प्रेरणादायी नेतृत्वामुळे शिक्षकांमध्ये नवी ऊर्जा निर्माण झाली असून, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबरोबरच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळाली आहे. प्रत्येक विद्यार्थ्याची क्षमता ओळखून त्याला प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे, शिक्षकांना प्रोत्साहन देणे आणि शाळेतील सर्व घटकांना सोबत घेऊन वाटचाल करणे, ही त्यांच्या नेतृत्वाची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. या प्रतिष्ठित पुरस्कारामुळे पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेरच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या यशाबद्दल शाळेचे उपप्राचार्य श्री. योगेश आवारी, कार्यालयीन प्रशासक श्री. सागर नेरपगार, मुख्याध्यापिका मयुरा निजामपूरकर, सर्व समन्वयक आणि शिक्षकवृंद यांनी सौ. मीनाक्षी मिश्रा यांचे अभिनंदन केले. तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या. उत्कृष्ट नेतृत्व, प्रभावी मार्गदर्शन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाप्रती असलेली बांधिलकी यांचा गौरव म्हणून या पुरस्काराकडे पाहिले जात आहे. सौ. मीनाक्षी मिश्रा यांच्या या यशामुळे शाळेच्या नावलौकिकात भर पडली असून, शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या इतरांनाही त्यांच्या कार्यातून प्रेरणा मिळत आहे.

पोदार इंटरनॅशनल स्कूल, संगमनेर परिवाराने या गौरवपूर्ण यशाबद्दल प्राचार्या सौ. मीनाक्षी मिश्रा यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## नोकरीची सुवर्णसंधी

## 'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'

**(सौर ऊर्जा कंपनी)** या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे

**पदे: Field Sales Executive**
**Business Development Manager**

कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग

**पात्रता**

* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक

**सुविधा**

आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा

संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165













# शेतकऱ्यांच्या वीज समस्यांचा महावितरणला घेराव

## वाढीव बिले, कमी दाब आणि पाणीपुरवठ्याचा प्रश्न ऐकून अधिकाऱ्यांसमोर तक्रारींचा पाढा



युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर -: वाढीव वीजबिले, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा, कमी दाब आणि पिण्याच्या पाण्यासाठीही वीज उपलब्ध होत नसल्याने संतप्त झालेल्या शेतकरी व वीज ग्राहकांनी अकोले येथील महावितरण कार्यालयात समस्यांचा पाढा वाचला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सूचनेनुसार आयोजित वीज तक्रार निवारण बैठकीत नागरिकांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याची मागणी केली.

कार्यकारी अधीक्षक अभियंता रमेश पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत पिंपळगाव खांड धरणातून पिण्याच्या पाण्यासाठी पाणी उचलण्याकरिता पुरेशी वीज मिळत नसल्याचा मुद्दा ऐरणीवर आला. गेल्या चार दिवसांपासून केवळ दोन तास वीज मिळत असल्याने पाणीपुरवठ्याचा प्रश्न गंभीर बनल्याचे नागरिकांनी सांगितले. वेळेवर वीजबिले न मिळणे, अधिकाऱ्यांची कार्यालयातील अनुपस्थिती, देवठाण सबस्टेशनचे रखडलेले काम आणि अकोले शहरातील रस्त्यालगतचे विद्युत पोल स्थलांतरित करण्याच्या मागण्याही मांडण्यात आल्या.

कळस बुद्रुक येथील दलित वस्तीतील स्ट्रीटलाईटच्या पोलवर विनापरवाना सिंगल फेजच्या पाच तारा टाकल्याची तक्रारही ग्रामस्थांनी केली. या प्रकाराची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली.

शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांची दखल घेत रमेश पवार यांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन समस्या मार्गी लावण्याचे निर्देश दिले. देवठाण येथील सबस्टेशनचे काम एका वर्षाच्या आत पूर्ण करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

बैठकीस माजी आमदार वैभवराव पिचड, आमदार डॉ. किरण लहामटे, महावितरणचे अधिकारी, विविध गावांतील शेतकरी, वीज ग्राहक व नागरिक उपस्थित होते. वीज समस्यांवर केवळ बैठका न घेता प्रत्यक्षात तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

# रईस मिर्झा पठाण यांची पुणे पोलीस आयुक्तांची भेट



संगमनेर- संगमनेर शहर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे कार्याध्यक्ष रईस मिर्झा पठाण यांनी पुणे पोलीस कमिशनर अमितेश कुमार यांची नुकतीच भेट घेऊन त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच विविध प्रश्नावर चर्चा केली.

# त्र्यंबकेश्वर मंदिर दोन महिने बंद राहणार?

नाशिक (प्रतिनिधी)

आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये सुरू असलेली विकासकामे वेगाने पूर्ण करण्यासाठी महत्त्वाचा पर्याय विचाराधीन आहे. भाविकांची मोठी गर्दी आणि सुरू असलेल्या बांधकामांमुळे कामांना अडथळे येत असल्याने त्र्यंबकेश्वर मंदिर दोन महिन्यांसाठी भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. मात्र, मंदिरातील नियमित पूजा-अर्चा सुरू राहणार असून, दर्शन बंद ठेवण्याबाबतचा अंतिम निर्णय देवस्थानच्या विश्वस्त मंडळाकडून घेतला जाणार आहे.

सिंहस्थ कुंभमेळ्याचा ध्वजारोहण सोहळा ३१ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या पार्श्वभूमीवर त्र्यंबकेश्वरमध्ये विविध विकासकामांना गती देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दर्शन पथाची निर्मिती, अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण, कुशावर्त तीर्थ परिसराचा विकास, प्राचीन मंदिरांचा जीर्णोद्धार, घाटांची उभारणी, फरशी बदलणे आणि गोदावरी नदी प्रवाही करण्याच्या योजनेसह अनेक कामे सध्या प्रगतिपथावर आहेत. दर्शन पथाच्या कामासाठी काही शासकीय इमारती हटवण्यात येत आहेत, तर विविध रस्त्यांवर खोदकाम सुरू आहे. या कामांमुळे परिसरात वाहतूक आणि नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होत असून, भाविकांच्या गर्दीमुळे विकासकामे पूर्ण करताना अडचणी निर्माण होत आहेत.

# डेंग्यू व टायफॉईडपासून बचावासाठी योग्य काळजी घेणे आवश्यक - डॉ. दिग्विजय शिंदे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळ्यानंतर डेंग्यू आणि टायफॉईडच्या रुग्णांमध्ये वाढ होण्याची शक्यता असते. त्यामुळे ताप, अंगदुखी, डोकेदुखी, अशक्तपणा, उलट्या किंवा पोटदुखी यांसारखी लक्षणे दिसल्यास दुर्लक्ष न करता वेळेत वैद्यकीय तपासणी करून घेणे आवश्यक आहे असा सल्ला मेडिकव्हर हॉस्पिटल संगमनेर येथील कन्सल्टंट फिजिशियन डॉ. दिग्विजय शिंदे यांनी दिला.



डेंग्यू हा संक्रमित एडिस डासाच्या चाव्यामुळे होतो. डेंग्यूपासून बचाव करण्यासाठी घराच्या परिसरात पाणी साचू न देणे, पाण्याची भांडी झाकून ठेवणे, डासांपासून संरक्षणासाठी पूर्ण अंग झाकणारे कपडे वापरणे तसेच आवश्यकतेनुसार मच्छर प्रतिबंधकांचा वापर करणे महत्त्वाचे आहे. डेंग्यूची लागण झाल्यास पुरेशी विश्रांती घेणे आणि डॉक्टरांच्या सल्ल्याने द्रवपदार्थांचे सेवन करणे आवश्यक आहे. तापासाठी औषध घेताना डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. (ॲस्पिरिन किंवा आयबुप्रोफेनसारखी **remove this)**औषधे स्वतःहून घेऊ नयेत.

डेंग्यूमध्ये ताप कमी झाल्यानंतरही विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. तीव्र पोटदुखी, वारंवार उलट्या, नाक किंवा हिरड्यांतून रक्तस्राव, रक्ताची उलटी किंवा शौचातून रक्त येणे, अत्याधिक अशक्तपणा किंवा अस्वस्थता अशी लक्षणे दिसल्यास तातडीने रुग्णालयात दाखल होऊन वैद्यकीय उपचार घेणे आवश्यक आहे.

टायफॉईडपासून बचावासाठी स्वच्छ पाणी आणि स्वच्छ अन्नाचे सेवन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उघड्यावरचे किंवा अस्वच्छ अन्न, दूषित पाणी टाळावे. हात स्वच्छ धुण्याची सवय लावावी. ताप अनेक दिवस राहणे, अशक्तपणा, डोकेदुखी, पोटदुखी, भूक मंदावणे, जुलाब किंवा बद्धकोष्ठता अशी लक्षणे असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. टायफॉईडचे निदान झाल्यास डॉक्टरांनी सांगितलेला प्रतिजैविक औषधांचा पूर्ण कोर्स घेणे महत्त्वाचे आहे. तापाकडे दुर्लक्ष करू नका; योग्य वेळी तपासणी, योग्य उपचार आणि स्वच्छतेच्या सवयी यामुळे डेंग्यू व टायफॉईडपासून मोठ्या प्रमाणात बचाव करता येतो, असे आवाहन डॉ. दिग्विजय शिंदे यांनी केले.

# अगस्ती इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थ्यांची 'बिसनेस एक्स्पो'ला भेट

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - अगस्ती इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, कॉम्प्युटर प्लिकेशन अँड रिसर्च, अकोले येथील एमबीए व एमसीए विभागातील विद्यार्थ्यांनी ३ ऑक्टोबर २०२६ रोजी लोणी येथे आयोजित 'बिसनेस एक्स्पो'ला भेट दिली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना विविध उद्योग, व्यवसाय संकल्पना तसेच आधुनिक तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळाली. बिसनेस एक्स्पोच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी विविध नवीन व्यवसाय कल्पना, स्टार्टअपच्या संधी, आधुनिक तंत्रज्ञान आणि उद्योग क्षेत्रातील बदलते प्रवाह यांचा अभ्यास केला. विद्यार्थ्यांना आपल्या शैक्षणिक ज्ञानाचा व्यावहारिक वापर कसा करता येतो, तसेच भविष्यातील



व्यवसाय व करिअरच्या संधी कोणत्या आहेत, याबाबत मार्गदर्शन मिळाले.

यावेळी प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ. संदीप सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याबरोबरच नव्या व्यवसाय संकल्पनांचा अभ्यास करून उद्योजकतेकडे सकारात्मक दृष्टिकोनातून पाहण्याचे आवाहन केले. या भेटीसाठी एमबीए विभागप्रमुख डॉ. गोपाल बूब, एमसीए विभागप्रमुख प्रा. अमोल नवले, तसेच प्रा. अमर खोंड, प्रा. प्रवीण पावडे, प्रा. अनुजा गोर्डे व सौ. आशा गोडसे यांनी सहकार्य केले. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासोबतच उद्योग व तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळावा आणि त्यांच्यामध्ये नवोपक्रम व उद्योजकतेची दृष्टी विकसित व्हावी, या उद्देशाने या शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. असे परीसंस्थेचे संचालक प्रा. डॉ. प्रशांत तांबे यांनी सांगितले.

# सर्व समाजांसाठी एकत्रित वसतिगृहे !

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांबाबत महत्त्वाचे निर्देश दिले आहेत. जाती-पातीच्या भिंती दूर करून सर्व समाजातील विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी चांगल्या सुविधा मिळाव्यात, यासाठी राज्यभरात एकत्रित विद्यार्थी वसतिगृहे उभारण्यात येणार असून त्यासाठी योग्य जागा निश्चित करून १३ ऑक्टोबरपर्यंत प्रस्ताव शासनाकडे पाठवावेत, असे मंत्री बावनकुळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले.

विभागीय स्तरावर एक हजार, तर जिल्हा स्तरावर ५०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेची वसतिगृहे उभारण्यात येणार आहेत. इतर मागासवर्ग बहुजन कल्याण विभागाच्या वसतिगृहांसाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत झालेल्या या बैठकीत आदिवासी, अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, मराठा तसेच सर्व समाजातील विद्यार्थ्यांना स्वतंत्र वसतिगृहांऐवजी भविष्यात एकाच ठिकाणी निवासाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या संकल्पनेवर चर्चा झाली. त्यासाठी योग्य आणि सोयीस्कर शासकीय जागा निश्चित करून प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या. वसतिगृहासाठी जागा निवडताना केवळ उपलब्ध शासकीय जागेचा विचार न करता विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून जागेची निवड करावी, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

# नट म्हणून मोठे असणारे आणि माणूस म्हणून श्रेष्ठ असणारे नाना



**इतनी शक्ती हमे देना दाता।**
**मन का विश्वास कमजोर ना होना।**

१९८६ अंकुश चित्रपटातील या गीतामध्ये प्रथम नाना आम्हाला भेटला. निशा सिंह,मदन जैन, अर्जुन चक्रवर्ती आणि ज्येष्ठ कलाकार आशालता वाबगावकर त्यांच्यासमवेत. हे गीत पुढे अनेक शाळांमध्ये प्रार्थना गीत म्हणून आजही गायले जात आहे. या प्रार्थना गीताने अनेक निराश झालेल्या मनांना उभारी दिली आहे. या गीताप्रमाणे नानाही आजारमर झाले आहेत. उत्कृष्ट अभिनयाबरोबरच स्वतःची वेगळी ओळख असणारी संवाद फेकीची शैली हे नानांचे वैशिष्ट्य होतं.

१९९३ च्या तिरंगा चित्रपटातील अपना तो उसूल है...पाहिले लात, फिर बात, उसके बाद मुलाकात! १९९४ मधील क्रांतिवीर चित्रपटातील आ गये मेरी मौत का तमाशा देखने.... सौ मे से ऐसी बेईमान फिर भी मेरा देश महान. १९९७ मधील यशवंत चित्रपटातील एक मच्छर साला आदमी को हिजडा बना देता है... परिंदा' धंधे में कोई किसी का भाई नहीं, कोई किसी का बेटा नहीं! पुरुष या गाजलेल्या मराठी नाटकातील संवाद ह्या जगात दोनच गोष्टी चालतात... एक पैशाची ताकद आणि दुसरी पुरुषाची जात! बाईने कितीही पंख पसरले, तरी ती पुरुषाच्या पायाखालीच शोभते.

राजकारण हा काही साधुसंतांचा खेळ नाही. इथे जो जिंकतो तोच राजा, मग त्यासाठी काहीही करावं लागलं तरी चालेल. नटसम्राट (चित्रपट)- कुणी घर देता का घर? एका तुफानाला कुणी घर देता का घर? To be or not to be... जगावं की मरावं हा एकच सवाल आहे. ह्या दुनियेच्या ऊकिरड्यावर खरकट्या पत्रावळीचा तुकडा होऊन जगाव बेशरम लाचार आनंदानं? हजारोंची मालमत्ता जमवून गुलाल बुक्क्यासारखी उधळली, तो हा नटसम्राट आपल्याच मुलांच्या घरी चोर ठरला!

'नटसम्राट' (चित्रपट)आम्ही नट आहोत ना... आमचं दु:ख सुध्दा आम्हाला वठवावं लागतं. लोक टाळ्या वाजवतात आणि आम्ही आतून संपत जातो. 'सामना' (चित्रपट - डॉ. श्रीराम लागूंसोबतचा संवाद) मास्तर, तुमची गोची झालीय. तुम्ही जुन्या काळात जगताय आणि नवा काळ तुमच्या हाताबाहेर गेलाय. 'पुरुष'- काय करणार तुम्ही? कायदा? अहो, कायदा आमच्या खिशात असतो आणि पोलीस आमच्या दारात! या जगात ताकद महत्त्वाची असते, नैतिकता नाही! चित्रपट कलावंत, नाट्य कलाकार याबरोबरच नाम फाउंडेशनच्या माध्यमातून दादांनी केलेले काम अजरामर आहे. आणि म्हणूनच नटसम्राट या चित्रपटांमध्ये विक्रम गोखले यांनी आप्पासाहेब बेलवलकर म्हणजेच नाना पाटेकर यांच्या श्रीमुखात दिल्यानंतर म्हटलेल्या तू नट म्हणून नीच आहेसच, पण माणूस म्हणूनही भिकारडा आहेस. या संवादात बदल करून म्हणावेसे वाटते. नाना नट म्हणून मोठे होतेच, पण माणूस म्हणूनही श्रेष्ठ होते.

**मुकुंद वसुंधरा कृष्णराव डांगे**
**संगमनेर, मोनं.**

# जयहिंद लोकचळवळ व मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून २८५ नागरिकांना कौशल्य प्रशिक्षण प्रमाणपत्र

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -विविध कौशल्यांचे पूर्ण ज्ञान व अनुभव असूनही सर्टिफिकेट अभावी अनेकांना कर्ज व इतर सुविधा मिळत नव्हत्या. मुक्त विद्यापीठाच्या माध्यमातून अशा व्यक्तींना व्यावसायिक प्रशिक्षण देऊन कौशल्य प्रमाणपत्र दिल्याने आता त्यांच्या श्रमांना प्रतिष्ठा मिळणार आहे. एआय यूगातही कष्टकरी व श्रमिकांना कायमच मोठी संधी राहणार असल्याचे प्रतिपादन राज्याचे माजी महसूल व शिक्षण मंत्री तथा अमृतवाहिनी विद्यापीठाचे कुलगुरू बाळासाहेब थोरात यांनी केले आहे.



सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात महाविद्यालयाच्या के.बी. दादा सभागृहामध्ये जयहिंद लोकचळवळ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कौशल्य प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी मा. आमदार डॉ. सुधीर तांबे हे होते तर व्यासपीठावर मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थी विभागाचे सचिव प्रा. डॉ प्रकाश देशमुख, पूर्व शिक्षण मूल्यांकन केंद्राचे संचालक प्रा. डॉ राम ठाकर, सौ दुर्गाताई तांबे, आरपीएल सल्लागार आतीक शेख, समन्वयक उबेद शेख, प्रा. बाबा खरात डॉ. नामदेवराव गुंजाळ, प्राचार्य डॉ बाळासाहेब वाघ, डी. एम. लांडगे, विजय राहणे दिलीप नागरे, जुनिअर कॉलेजचे प्राचार्य एस एम खेमनर, सौ प्रमिला अभंग, ड अनंत शिंदे, सौ सुनीता कांदळकर, सौ प्रतिभा माडकर, अंजुम बागवान , हर्षल थेटे, सुरज कर्डिले यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी मुक्त विद्यापीठाचे प्रशिक्षण कोर्स पूर्ण करून राजापूर शासकीय आयटीआय येथून परीक्षा देऊन उत्तीर्ण झालेल्या २८५ व्यक्तींना प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले यामध्ये कोपरगाव येथील मेकॅनिक मधील १११ प्रशिक्षणार्थी संगमनेर मधील टेलरिंग विभागातून ९६ प्रशिक्षणार्थी कॉस्मेटिक मधून १३ प्रशिक्षणार्थी इलेक्ट्रिशियन मधून २७ वेल्डर मधून २५ प्लंबर मधून सहा असे एकूण २८५ व्यक्तींना विद्यापीठाचे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की मुक्त विद्यापीठ ही संकल्पना फार सुंदर आहे शिक्षणापासून वंचित असणाऱ्या अनेकांना शिक्षण पूर्ण करण्याची संधी यामधून मिळते आहे अनेक लोक पदवीधर झालेले आहेत. याचबरोबर जे कष्ट करतात काम करतात शिक्षणापासून दूर आहे त्यांना ही प्रमाणपत्र देऊन त्यांच्या श्रमाला आणि कामाला प्रतिष्ठा देण्याचे काम मुक्त विद्यापीठाने केले आहे. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स चा जमाना आहे अशा काळातही कष्टकरी व श्रमिकांना मोठी किंमत असून ती पुढेही राहणार आहे.

तर मा आमदार डॉ सुधीर तांबे म्हणाले की, बुद्धिमत्ता ही निसर्ग दत्त व अलौकिक देणगी आहे जी मानवाबरोबर प्राणीमात्रांमध्येही आहे. कौशल्यांचा सन्मान झाला पाहिजे याकरता हा उपक्रम राबविण्यात आला असून संशोधनामुळे देशाचा फायदा होतो. मुक्त विद्यापीठाने सर्वांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली असून येत्या काळात स्टार्टअप, आर्थिक साक्षरता व ॲडव्हान्स ट्रेनिंग प्रोग्राम राबविण्यात येतील.

तर प्रा. डॉ प्रकाश देशमुख म्हणाले की समाजाच्या विकासाकरता समता प्रस्थापित होणे अत्यंत गरजेचे आहे. संगमनेर तालुक्याने कायम समतेचा विचार पुढे नेले असून गोरगरिबांच्या कौशल्याला वाव देण्यासाठी काम केले आहे. येथे तुमच्या कौशल्यला मान मिळत असून माणुसकीच्या धर्माची पूजा संगमनेर मध्ये केली जात आहे .

# संपादकीय...

## जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त

# तणावमुक्त जीवनासाठी मानसिक स्वास्थ्य जपा

दरवर्षी १० ऑक्टोबर हा दिवस जागतिक मानसिक आरोग्य दिन म्हणून साजरा केला जातो. मानसिक आरोग्याविषयी जनजागृती करणे, मानसिक आजारांबाबत समाजात असलेले गैरसमज दूर करणे आणि मानसिक समस्यांचा सामना करणाऱ्या व्यक्तींना योग्य मदत मिळवून देणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे. शारीरिक आरोग्याइतकेच मानसिक आरोग्यही महत्त्वाचे आहे. निरोगी शरीरासोबत निरोगी मन असेल, तरच व्यक्ती आनंदी आणि समाधानी जीवन जगू शकते. आजच्या धावपळीच्या जीवनात मानसिक आरोग्याचा प्रश्न अधिक गंभीर बनत आहे. शिक्षणातील स्पर्धा, नोकरीचा ताण, आर्थिक अडचणी, कौटुंबिक समस्या, वाढत्या अपेक्षा आणि सामाजिक दबाव यांमुळे अनेक व्यक्तींना मानसिक तणावाचा सामना करावा लागतो. पूर्वी मानसिक आरोग्याविषयी फारशी चर्चा होत नसे; मात्र आज लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत अनेकांना मानसिक अस्वस्थतेचा अनुभव येत आहे. त्यामुळे मानसिक आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करणे ही काळाची गरज आहे. मानसिक आरोग्य म्हणजे केवळ मानसिक आजार नसणे नव्हे, तर भावनिकदृष्ट्या स्थिर राहणे, तणावाचा सामना करणे, योग्य निर्णय घेणे आणि इतरांशी चांगले संबंध ठेवणे होय. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात आनंद, दुःख, चिंता, भीती आणि निराशा असे विविध अनुभव येतात. मात्र, या भावना दीर्घकाळ टिकून राहिल्या आणि त्यांचा दैनंदिन जीवनावर परिणाम होऊ लागला, तर त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. आजच्या काळात सोशल मीडियाचाही मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. इतरांच्या यशाशी स्वतःची तुलना करणे, अधिक चांगले दिसण्याचा प्रयत्न करणे, सतत मोबाईल वापरणे आणि समाजाकडून मिळणाऱ्या प्रतिक्रियांवर अवलंबून राहणे यामुळे अनेकदा न्यूनगंड आणि अस्वस्थता निर्माण होते. विद्यार्थ्यांमध्ये परीक्षेचे दडपण, अपेक्षेप्रमाणे गुण न मिळाल्याची निराशा आणि करिअरविषयीची चिंता दिसून येते. तरुणांना रोजगार आणि भविष्याची चिंता सतावते. नोकरदार व्यक्तींना कामाचा ताण, तर ज्येष्ठ नागरिकांना एकटेपणा आणि बदलत्या कौटुंबिक परिस्थितीचा सामना करावा लागतो. मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत समाजात अजूनही अनेक गैरसमज आहेत. मानसिक त्रास होणे म्हणजे व्यक्ती कमकुवत असणे किंवा मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेणे म्हणजे वेडेपणा, अशा चुकीच्या समजुतींमुळे अनेक जण आपला त्रास इतरांपासून लपवतात. परिणामी, त्यांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. नैराश्य, चिंताविकार आणि इतर मानसिक समस्यांकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. मानसिक आरोग्याच्या समस्यांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, समुपदेशन आणि आवश्यकतेनुसार औषधोपचारांच्या मदतीने उपचार करता येतात. मानसिक आरोग्य चांगले राखण्यासाठी दैनंदिन जीवनात चांगल्या सवयी अंगीकारणे महत्त्वाचे आहे. नियमित व्यायाम करणे, पुरेशी झोप घेणे, संतुलित आहार घेणे आणि ध्यानधारणा करणे यामुळे तणावाचे व्यवस्थापन करण्यास मदत होऊ शकते. कामासोबत स्वतःसाठीही वेळ काढणे, आवडीच्या गोष्टी करणे, मित्रांशी संवाद साधणे आणि कुटुंबासोबत वेळ घालवणे आवश्यक आहे. मनात चिंता किंवा दुःख साचवून ठेवण्याऐवजी विश्वासू व्यक्तीशी मोकळेपणाने बोलले पाहिजे. मानसिक आरोग्य जपण्यात कुटुंबाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. घरातील प्रत्येक व्यक्तीला आपले विचार आणि भावना मोकळेपणाने व्यक्त करता येतील, असे वातावरण असावे. मुलांवर अभ्यासाचे आणि यशाचे अवास्तव दडपण टाकण्याऐवजी त्यांना समजून घेणे गरजेचे आहे. मुलांच्या गुणांपेक्षा त्यांच्या प्रयत्नांना आणि भावनिक गरजांना महत्त्व दिले पाहिजे. त्याचप्रमाणे, एखादी व्यक्ती मानसिक तणावातून जात असेल, तर तिची थट्टा करण्याऐवजी तिचे म्हणणे शांतपणे ऐकून घेणे आणि तिला आधार देणे आवश्यक आहे.


## पाहिजेत

आमचे सहकारी औद्यगिक वसाहतीसाठी खालील पदे भरावयाची आहेत.तरी पात्र उमेद्वारांनी स्वःहस्ताक्षरातील अर्ज व शैक्षणिक कागदपत्रांच्या सत्यप्रती दि.२३.१०.२०२६ पर्यंत वरील पत्त्यावर पोहचतील अशा रितीने पाठवावेत.

| अ.नं. | पदाचे नांव | संख्या | शैक्षणिक पात्रता | अनुभवी(सहकारी संख्या) |
|---|---|---|---|---|
| १. | क्लार्क (महिला/पुरुष) | २ | बी.कॉम | २ वर्षापेक्षा जास्त तसेच संगणक व सहकार कायद्याचे ज्ञान आवश्यक |

१. मुलाखतीसाठी येणाऱ्या उमेद्वारांना कोणतेही भत्ता दिला जाणार नाही.
२. योग्य व पात्र उमेद्वार न मिळाल्यास भरती प्रक्रिया स्थगित/रद्द करण्याचे अधिकार संचालक मंडळास राहील.
३. मुलाखतीमध्ये उमेद्वार पत्र वाटल्यास शैक्षणिक अर्हतेमध्ये शिथीलता देण्याचा अधिकार संचालक मंडळास राहील.

श्री.सोमनाथ रामनाथ पाबळकर
व्हा.चेअरमन

श्री.के.के.थोरात
चेअरमन


# मातीच्या कपाळावरचा करंटेपणा पुसण्याचा एक आशादायी प्रयत्न

**(११ ऑक्टोबर २०२६ ला उदयमुख लेखक अशोक शेटे यांची कांदबरी मातीचा कपाळकरंटा प्रकाशित होत आहे. शिवाजी कोण होता? पुस्तकाचे प्रकाशक कॉ. प्रशांत आंबी यांनी हि कांदबरी प्रकाशित केली आहे. त्यांचे प्रकाशकीय मनोगत.)**




ग्रामीण महाराष्ट्र म्हटलं की आपल्या डोळ्यांसमोर हिरवीगार शिवारं, डोलणारी पिकं, बैलगाड्या, मातीचा सुगंध आणि एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होणारं माणुसकीनं भरलेलं गाव उभं राहतं. पण या रम्य चित्रामागे आज एक वेगळंच वास्तव आकार घेत आहे. शेती संकटात आहे, शेतकऱ्याचा आर्थिक कणा मोडत आहे.त्याचबरोबर ग्रामीण समाजव्यवस्थेची मुळंही हळूहळू सुकत आहेत. या अस्वस्थ वास्तवाकडे साहित्याने आणि समाजाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. 'मातीचा कपाळकरंटा' ही कादंबरी त्या गरजेतून निर्माण झाली आणि माझ्यापर्यंत आली.

शिक्षक आणि उदयमुख लेखक अशोक शेटे यांची ही कादंबरी वाचताना मला जाणवलं की हा केवळ दीपक नावाच्या एका तरुणाचा जीवनप्रवास नाही. हा आजच्या ग्रामीण महाराष्ट्रातील हजारो शेतकरी तरुणांच्या मनात दडलेल्या अस्वस्थतेचा आवाज आहे. शिक्षण घेऊनही शेतीपासून दूर जाता येत नाही आणि शेती करूनही सन्मानाने जगता येत नाही.अशा कात्रीत अडकलेल्या पिढीची ही कहाणी आहे. कादंबरीतील दीपक हा बी.एस्सी. ग्री झालेला, कष्टाळू आणि स्वप्नं पाहणारा तरुण आहे; पण त्याच्या शिक्षणापेक्षा त्याच्या 'शेतकरी' असण्याला विवाहाच्या बाजारात कमी मोल दिले जाते. त्यातूनच त्याच्यासारखे असंख्य शेतकरी पुत्रांचे लग्न होत नाहीत. हा केवळ वैयक्तिक किंवा कौटुंबिक प्रश्न नाही; तो ग्रामीण समाजाच्या भवितव्याशी जोडलेला सामाजिक प्रश्न आहे. एका बाजूला मुलगा शेती करतो म्हणून मुलगी देण्यास नकार, तर दुसऱ्या बाजूला शेतकरी कुटुंबातील मुलीसाठी मात्र 'नोकरी करणारा' मुलगा शोधण्याची मानसिकता.या विरोधाभासातून ग्रामीण समाजाच्या बदलत्या मूल्यव्यवस्थेचे विदारक चित्र कादंबरी उभे करते.

मला या कादंबरीचे आणखी एक वैशिष्ट्य महत्त्वाचे वाटते. लेखकाने कादंबरीचा नायक दीपक केवळ रडणारा, हतबल किंवा परिस्थितीचा बळी म्हणून मांडलेला नाही. त्याच्या संघर्षाबरोबरच त्याची स्वप्नं, स्वाभिमान, प्रेम, नाती, चुका, अंतर्विरोध आणि परिस्थिती बदलण्याची धडपडही मांडली आहे. दीपकच्या मनातील वेदना केवळ वैयक्तिक दुःख न राहता गाव आणि शेतीच्या भवितव्याचे प्रश्न बनतात. कादंबरीतून हुंडा, खोटी प्रतिष्ठा, कर्जबाजारीपणा, शेतीकडे पाहण्याचा बदललेला दृष्टिकोन, ग्रामीण तरुणांचे वैचारिक दारिद्र्य, व्यसनांकडे वाढणारा कल आणि सोशल मीडियाच्या आभासी जगात हरवत जाणारी पिढी यांवरही लेखकाने भाष्य केले आहे.

'मातीचा कपाळकरंटा' हे शीर्षक म्हणूनच मला भावते.माती कपाळकरंटी नाही; आपण तिच्याशी केलेला व्यवहार, शासनाच्या धोरणांनी निर्माण केलेली परिस्थिती आणि समाजाच्या बदललेल्या मूल्यांनी तिच्या कपाळावर करंटेपणाचा मारलेला शिक्का. तिला दुर्दैवी करते. कादंबरीचा शेवट निराशेच्या अंधारात होत नाही. उलट, मातीशी प्रामाणिक राहून, विचारांची मशाल हाती घेऊन आणि ग्रामीण समाजाला नव्या दिशेने नेण्याची आशा लेखक जिवंत ठेवतो. एक प्रकाशक म्हणून अनेक पुस्तके हाताळताना मला नेहमीच वाटत आले आहे की साहित्याने केवळ मनोरंजन करू नये; त्याने समाजाला अस्वस्थही करावे . अशोक शेटे यांनी ही अस्वस्थता शब्दबद्ध करण्याचे धाडस केले आहे. म्हणूनच ही कादंबरी प्रकाशित करण्याचा निर्णय माझ्यासाठी केवळ प्रकाशनाचा व्यवहार नाही; तर एका महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाला व्यासपीठ देण्याची जबाबदारी आहे. 'मातीचा कपाळकरंटा' वाचताना वाचकाने केवळ एका कादंबरीची कथा वाचू नये; तर आपल्या आजूबाजूच्या गावाकडे, शेताकडे आणि शेतकरी तरुणांच्या भविष्याकडे नव्या नजरेने पाहावे-हीच या पुस्तकाकडून माझी अपेक्षा आहे. कादंबरी वाचून सुशिक्षित तरुणांना शहरातील धावपळीच्या, कृत्रिम आणि कोंदट आयुष्यापेक्षा गावची माती, शेती आणि मोकळं जीवन अधिक आपलंसं वाटलं; त्यांनी नोकरीच्या चौकटीपलीकडे विचार करून शेती, स्वयंरोजगार आणि निसर्गाशी नातं जोडत जगण्याचा निर्णय घेतला, तरी या लेखनाचं सार्थक झालं असं मला वाटेल. सुशिक्षित तरुणींच्या मनात 'शेतकरी म्हणजे मागासलेपण नव्हे; कष्ट, प्रामाणिकपणा आणि मातीशी नातं जपणारा शेतकरी मुलगाही सुखी संसाराचा उत्तम साथीदार होऊ शकतो,' असा विश्वास निर्माण झाला. त्यांनी शेतकरी तरुणांचे हात आयुष्यभरासाठी धरले , तर अशोक शेटे यांच्या लेखणीने आपल्या समाजाच्या कपाळावरचा हा 'करंटेपणा' पुसण्याच्या दिशेने एक पाऊल टाकले, असे मला मनापासून वाटेल.

शेती वाचली तर गाव वाचेल, ग्रामीण संस्कृती वाचेल, माणसामाणसांतील नाती वाचतील आणि आपल्या मातीशी जोडलेली पुढची पिढीही वाचेल. 'मातीचा कपाळकरंटा' ही केवळ कादंबरी न राहता या परिवर्तनाची छोटीशी ठिणगी ठरो, हीच मनापासूनची अपेक्षा!



**– कॉ. प्रशांत आंबी**
**प्रकाशक व संपादक**


## महाराष्ट्र शासन

**रो.ह.यो.(कार्य).विभाग अहिल्यानगर**
**पत्ता:-बाधकाम भवन, नगर-छ.संभाजीनगर रोड,अहिल्यानगर**
ई-मेल पत्ता:-egsahmednagar.cc@mahapwd.com दुरध्वनी/ क्रमांक ०२४१-२४२२९३८

### ई-निविदा सुचना क्रं.८ सन २०२६-२७

कार्यकारी अभियंता रो.ह.यो.(कार्य).विभाग अहिल्यानगर महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उप कंमनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेऊ शकेल.खालील कार्यकारिता ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविता आहेत.निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर यथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता रो.ह.यो.(कार्य).विभाग अहिल्यानगर यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत लाखात | ठेविदार पात्रता |
|---|---|---|---|
| १ | सोनई-कांगोली ते अहिल्यानगर संभाजीनगर रस्ता(प्र.जि.मा) १८९कि.मी १०/००ते १८/४००मजबूतीकरण करणे.ता. नेवासा जि.अहिल्यानगर | १६९६.३५ | निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रिय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेऊ शकेल |
| २ | कांगोणी-च.खरवंडी रस्ता इजिमा३३२ कि.मी.०/००ते३/८५० आणि खरवंडी वडाळा बहीरोबा रस्ता (प्रजिमा३२कि.मी ३०/४५०ते ३३/१५०)मध्ये सुधारणा करणे.ता.नेवासा जि. अहिल्यानगर | ११६३.५१ | निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रिय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेऊ शकेल |
| ३ | सोनई घोडेगाव कुकाणा रस्ता रामा-६६(कि.मी.३४/८००ते ४२/८००)ची सुधारणा करणे व लहान पुलाचे बांधकाम करणे. | १०९१.६७ | निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रिय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल |
| ४ | रामा-६६ते शनी शिंगनापुर ग्रमा२४७शनी शिंगणापूर ते कांगाणी रस्ता ग्रामा-१२८मध्ये सुधारणा करणे.ता.नेवासा जि. अहिल्यानगर | ६२२.६६ | निविदेतील अटी व शर्ती यांची पुर्तता करतील असे सक्षम कंत्राटदार तसेच आंतरराष्ट्रिय कंत्राटदार यांची उप कंपनी भारतीय असल्यास निविदेमध्ये भाग घेवू शकेल |

| | | |
|---|---|---|
| ई-निनिदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक ०९/१०/२०२६ ते दिनांक १६/१०/२०२६ |
| निविदापुर्व बैठक | :- | अ.क्र.१ते४ दि.१२/१०/२०२६(बैठकीचे ठिकाण-मुख्य अभियंता,यांचे कार्यालय,सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,नाशिक) वेळ दुपारी १२.३० वाजता |
| ई-निनिदा उघडणे | :- | दिनांक १९/१०/२०२६ |

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.
1.www.mahapwd.com 2. mahatenders.gov.in
१.(सदर निनिदासूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)
३.कार्यकारी अभियंता रो.ह.यो.(कार्य).विभाग अहिल्यानगर कार्यलयातील सूचना
जा.क्र.लेखा/निविदा/ ४२४३ सन २०२६
कार्यकारी अभियंता,यांचे कार्यालय.
रो.ह.यो.(कार्य)विभाग.
अहिल्यानगर दिनांक ०१/१०/२०२६

(वाय.एस.कोकरे)
कार्यकारी अभियंता
रो.ह.यो.(कार्य)विभाग,
अहिल्यानगर



## छोट्या जाहिरातीसाठी संपर्क करा

८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTA YOUTUBE CHANNEL

Daily Yuvavarta

Urgently Required
Office Manager
Sangamner (1 Post)
Valuation Report Typist,
Property Visit.
Office Management.
Contact-
9421911671

CHANGE IN NAME
I HAVE CHANGED MY OLD NAME
LATA YOGESH KASAT
NEW NAME AS
PREMLATA YOGESH KASAT
BY AFFIDAVIT NO 1268/2026
DATE - 08/10/2026
ADD - 1865, RANGAR GALL, SANGAMNER, AHILAYANAGAR,422605

## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

(महाराष्ट्र नगरपरिषद अधिनियम १९६५ चे कलम ३२३ अन्वये कलम २७८ (१) १४८ (१) ३३८ (२) (३) आणि त्यांचे परंतुक अन्वये संगमनेर नगरपरिषद हद्दीतील कारखान्याचे नियम कलमासंबंधी उपविधी मधील कलम ५ (३) अन्वये)

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, श्रीमती अलका भाऊसाहेब पर्बत रा. १३२ के व्ही रोडी, साईश्रद्धा चौक, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अ.नगर म्यु.घ.नं. -, सि. स. नं. ३७०/२/१५ स.नं. - या ठिकाणी मध्ये रासायनिक खते, बी-बियाणे तसेच सर्व प्रकारचे ऑरगॅनिक औषधे व खते तसेच शेतीसाठी उपायोगी वस्तू चा व्यवसाय सुरू करणेसाठी त्यांनी त्यांचा अर्ज कौन्सिलकडे दिलेला आहे. सदर व्यवसाय सुरू करण्यास कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांचे आत खाली सही करणाराकडे कार्यालयीन वेळेत आणून द्यावी. अन्यथा वरील संबंधी कोणाची काही तक्रार नाही असे समजून संबंधीतास परवानगी दिली जाईल. याची नागरीकांनी नोंद घ्यावी.

दि. ०८/१०/२०२६ मुख्याधिकारी – संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

**पाहिजेत**
रिसेप्शनिस्ट- १
(स्त्री / पुरूष)
शिक्षणास प्राधान्य
कॉम्प्युटर ज्ञान,
- संपर्क -
8378956909
8459199913
बायोडाटा पाठवा

**पाहिजेत**
युवा ध्येय वृत्तपत्र संगमनेर कार्यालयासाठी अर्जंट पाहिजे
उपसंपादक - १ M
जाहिरात व्यवस्थापक - १ M
डिझायनर - १ M/F
टेलिकॉलर - १ M/F
कार्यालय - युवा ध्येय, विठ्ठल स्मृती कॉम्प्लेक्स, अकोले रोड, संगमनेर
फोन (०२४२५)२६१८७२
७७६८०७१२७२,९३७०७७३५०४

**पाहिजेत**
ड्रायव्हर कम हेल्पर पाहिजे
आत्मशांती टी सेंटर
( सपट चहा)
नेहरु चौक, संगमनेर
9922113534
9730468090

**पाहिजेत**
सेल्समन - ४ जागा
अकाऊंटंट - १ जागा
मॅनेजर - १ जागा
(अनुभवास प्राधान्य )
आकर्षक पगार दिले जाईल
मैड सराफ अँण्ड सन्स
नेहरूचौक, संगमनेर
9850530266

**पाहिजेत**
डिप्लोमा सिव्हिल इंजिनिअर - 2 जागा
स्वतःची टू व्हीलर लायसन्स आवश्यक
B & K Construction
7758009532
7028456005

**20 गुंठे जागा भाडे तत्त्वावर देणे आहे**
नूतन माध्यमिक विद्यालया पुढे, राजापूर, तालुका- संगमनेर. जिल्हा अहिल्यानगर.
7798616908

**पाहिजेत**
कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)

**जागा भरणे आहे**
ऑफिस बॉय
ऑफिस क्लार्क
महिला किंवा पुरूष
इलेक्ट्रॉनिक मशिनरी चालविणेचा अनुभव असलेला कारागीर
वॉचमेन
अनुभवास प्राधान्य
- संपर्क -
9822334431






# सेवा संकल्प अभियानातून मातृ व बाल आरोग्याबाबत जनजागृती

## जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांमध्ये मार्गदर्शन सत्रांचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर- राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून 'बाळाची सुवर्णमयी ८ वर्षे' हा नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येणार आहे. मुलांच्या मेंदूचा ९०% विकास त्याच्या वयाच्या आठ वर्षांच्या आतच होत असतो म्हणून बालकाच्या प्रारंभीक विकासासह त्याच्या आरोग्याचा भक्कम पाया निर्माण करण्यासाठी या उपक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील गरोदर व स्तनदा मातांमध्ये व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे.

बालकाच्या आयुष्यातील पहिली आठ वर्षे ही शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असतात. त्यात विशेषतः गर्भधारणेपासून बालकाच्या जन्मानंतरच्या पहिल्या दोन वर्षांपर्यंतचा सुमारे १,००० दिवसांचा कालावधी अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गर्भावस्थेतील सुमारे २७० दिवस आणि जन्मानंतरचे सुमारे ७३० दिवस मिळून हा कालावधी होतो. या काळात बालकाच्या मेंदूची वाढ, शारीरिक विकास, रोगप्रतिकारशक्ती आणि भविष्यातील आरोग्याचा पाया मजबूत होण्यास मदत होते.



या अनुषंगाने गर्भावस्थेतील मातृपोषण, संतुलित आहार, आवश्यक आरोग्य तपासण्या, डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लोह व फॉलिक ॲसिडसह आवश्यक पूरक आहाराचे सेवन याबाबत गरोदर मातांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे. तसेच जन्मानंतरच्या काळात बालकाची योग्य काळजी, पोषण, आरोग्य आणि मेंदूच्या विकासासाठी आवश्यक बाबींबाबतही पालकांना माहिती दिली जाणार आहे.

उपक्रमांतर्गत ० ते ३ वर्षे, ३ ते ६ वर्षे आणि ६ ते ८ वर्षे अशा वयोगटानुसार बालकाच्या विकासासाठी आवश्यक काळजी व पालकांची भूमिका याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. बालकाच्या शारीरिक वाढीसोबतच त्याच्या बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकासासाठी पोषक वातावरण निर्माण करण्यावरही भर देण्यात येणार आहे.

**प्रत्येक महिन्यात आरोग्य केंद्रांवर मार्गदर्शन** - जिल्ह्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये दर महिन्याच्या ९ तारखेला, तर उपकेंद्रांमध्ये दर महिन्याच्या १० ते १४ तारखेपर्यंत गरोदर महिला व स्तनदा मातांसाठी मार्गदर्शन सत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. या सत्रांना मातांसोबत त्यांच्या पतींनीही उपस्थित राहावे, यासाठी संबंधित वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, अंगणवाडी पर्यवेक्षिका, अंगणवाडी सेविका आणि आशा स्वयंसेविका यांच्या माध्यमातून पूर्वसूचना देऊन पालकांना आमंत्रित करण्यात येणार आहे. या सत्रांमध्ये 'बाळाची सुवर्णमयी ८ वर्षे' या संकल्पनेचे महत्त्व, पहिल्या १,००० दिवसांचे महत्त्व, मातृ व बाल आरोग्य, पोषण, बालकाच्या मेंदूची वाढ आणि बालकाच्या सर्वांगीण विकासासाठी पालकांनी घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. बालकाच्या आरोग्याचा पाया जन्मानंतर नव्हे, तर गर्भधारणेपासूनच घडत असल्याने या उपक्रमाच्या माध्यमातून 'सुदृढ माता, निरोगी बालक आणि सक्षम भवितव्य' या उद्देशाने पालकांपर्यंत योग्य आरोग्यविषयक माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील अधिकाधिक गरोदर व स्तनदा मातांनी या उपक्रमाचा लाभ घेऊन आपल्या बालकाच्या आरोग्यपूर्ण आणि सर्वांगीण विकासासाठी मार्गदर्शन घ्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले आहे.

# दसऱ्यानंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीत माघारीचे सिमोल्लंघन?

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्याची घोषणा केल्यानंतर मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दखल झालेले आहे. छाननीनंतर वैध उमेदवारांची यादी प्रसिध्द झाल्यानंतर पहिल्या दोन दिवसात शेतीपूरक मतदारसंघातून एका उमेदवाराची माघार झाली असून अद्याप अनेक मतदारसंघात मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज शिल्लक आहेत. दरम्यान, जिल्हा बँकेसाठी २२ ऑक्टोबरपर्यंत माघारीसाठी मुदत असून यामुळे खर्याअर्थाने दसर्यानंतर उमेदवारी माघारीचे सिमोलंघन करणार असल्याचे चित्र आहे. दरम्यान, जिल्हा बँकेची निवडणूक पूर्ण ताकदीने लढविण्याचा निर्धार खा. निलेश लंके व माजी खासदार सदाशिव लोखंडे यांनी व्यक्त केला. जिल्हा बँकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समविचारी उमेदवारांसोबत नुकतीच बैठक घेण्यात आली. या बैठकीला इच्छुक उमेदवार व मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. जिल्हा बँक ही सर्वसामान्य शेतकर्यांची बँक असून, तिच्या माध्यमातून शेतकरी व ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठा आधार मिळतो. त्यामुळे बँकेचा कारभार सर्वसामान्य शेतकर्यांच्या हिताचा राहिला पाहिजे, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

मात्र, शेतकर्यांची बँक न राहता ठराविक कारखानदारांची व भांडवलदारांची झाल्याची टीकाही करण्यात आली. त्यामुळे बँकेची निवडणूक ताकदीने लढविण्याचा निर्णय घेण्यात आला. दुसरीकडे बँकेसाठी माघारीच्या दोन दिवसात अवघा एकच उमेदवारी अर्जाची माघार झालेली असून शेतीपूरक मतदारसंघातून त्रिंबक सरोदे यांचा अर्ज माघारी घेण्यात आला असल्याचे बँक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यावतीने सांगण्यात आले.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी वीज कामगार महासंघाचा पुढाकार

## मुख्यमंत्री सहायता निधीला पाच लाखांची मदत

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक संकटातून दिलासा मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी पाच लाख रुपयांची मदत दिली आहे. महासंघाचे अध्यक्ष विठ्ठल भालेराव आणि महामंत्री अरुण पिवळ यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनातून ही माहिती दिली. यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे.



पावसाअभावी पिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून, शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संकटाच्या काळात शेतकऱ्यांना मदतीचा हात मिळावा, या भावनेतून महासंघाने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी पाच लाख रुपयांचे योगदान दिले आहे.

महाराष्ट्र वीज कामगार महासंघ ही भारतीय मजदूर संघाशी संलग्न असलेली संघटना आहे. वीज कामगारांच्या विविध प्रश्नांसाठी कार्यरत असतानाच महासंघ सामाजिक बांधिलकी जपण्याचे कामही करीत आहे. नैसर्गिक आपत्ती आणि संकटाच्या काळात गरजू नागरिकांना मदत करण्याची भूमिका संघटनेने वेळोवेळी घेतली आहे.

कोरोना महामारीच्या काळातही महासंघाने मुख्यमंत्री सहायता निधीसाठी पाच लाख रुपयांची मदत केली होती. समाजातील विविध घटकांनी संकटग्रस्तांच्या मदतीसाठी पुढे येणे गरजेचे आहे. नैसर्गिक आपत्तीच्या काळात सामाजिक संस्था, संघटना आणि दानशूर व्यक्तींनी आपापल्या परीने योगदान द्यावे, असे आवाहनही महाराष्ट्र वीज कामगार महासंघाने केले आहे. महासंघाच्या या उपक्रमातून सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधोरेखित झाली आहे.

# दुष्काळ पाहणीसाठी केंद्रीय पथक संभाजीनगरात

छ.संभाजीनगर-

यंदा पावसाने ओढ दिल्याने मराठवाड्यात खरीप हंगामाचे मोठे नुकसान झाले असून, अनेक जिल्ह्यांवर दुष्काळाचे सावट घोंघावत आहे. या भीषण दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे एक विशेष पथक छत्रपती संभाजीनगरमध्ये दाखल झाले आहे. काल रात्री उशिरा या पथकाने विभागीय आयुक्त आणि सर्व जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन मराठवाड्यातील पाणीटंचाई आणि पिकांच्या नुकसानीचा सविस्तर आढावा घेतला. आजपासून या पथकाने प्रत्यक्ष गावांमध्ये जाऊन स्थळपाहणीला सुरुवात केली आहे.

केंद्रीय पथकाने आज छत्रपती संभाजीनगर तालुक्यातील देवळी (देवळी) या गावाला भेट देऊन बांधावर जात पाहणी केली. यावेळी पथकातील अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला आणि परिस्थिती किती बिकट आहे, याचा प्रत्यक्ष अंदाज घेतला. या दौऱ्याबाबत माहिती देताना एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, हे केंद्रीय पथक संपूर्ण मराठवाड्याची पाहणी करणार आहे. हा दौरा अजून ३-४ दिवस चालेल. त्यानंतर लवकरात लवकर याचा अहवाल तयार करून केंद्र सरकारला पाठवला जाईल. या अहवालानंतर केंद्र आणि राज्य सरकारकडून मदतीबाबत पुढील घोषणा केली जाईल.पाहणी दरम्यान एका पत्रकाराने शेतकऱ्यांच्या व्यथा मांडत अधिकाऱ्यांना थेट प्रश्न विचारला.

# दिल्ली आंदोलनापूर्वी पोलिसांची धरपकड

## मेट्रो स्थानके बंद, रेल्वे गाड्या रद्द, पोलिसांची कडेकोट नजर

नवी दिल्ली

कॉकरोच जनता पार्टीने उद्या, १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत आयोजित केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राजधानीतील सुरक्षा व्यवस्था कडक करण्यात आली आहे. दिल्ली पोलिसांनी जंतर-मंतरवरील आंदोलनाला परवानगी नाकारली असून, आंदोलनात सहभागी होण्यासाठी देशाच्या विविध भागांतून येणाऱ्या समर्थकांना ताब्यात घेतले जात असल्याचा आरोप पक्षासह डाव्या विचारसरणीच्या संघटनांनी केला आहे. दुसरीकडे, संभाव्य गर्दी आणि कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न लक्षात घेऊन रेल्वे, मेट्रो आणि सार्वजनिक ठिकाणी विशेष खबरदारी घेतली जात असल्याची माहिती समोर आली.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर दिल्लीतील ५७ मेट्रो स्थानके बंद ठेवण्याचा आणि त्यापैकी १० स्थानकांचा अटक केलेल्या व्यक्तींना ठेवण्यासाठी वापर करण्याचा निर्णय घेतल्याचे वृत्त आहे. दिल्ली पोलिसांनी जंतर-मंतर परिसरात भारतीय नागरिक सुरक्षा संहितेचे कलम १६३ लागू केले असून, पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यावर निर्बंध असल्याचे स्पष्ट केले आहे. आदेशांचे उल्लंघन केल्यास कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

एका वृत्तसंस्थेच्या माहितीनुसार, नवी दिल्ली आणि हजरत निजामुद्दीन स्थानकांकडे जाणाऱ्या सर्व मेल आणि एक्स्प्रेस गाड्या शनिवारी रद्द राहणार असल्याचे वृत्त आहे. रेल्वेने संबंधित गाड्या त्यांच्या मूळ स्थानकांवरूनच रद्द केल्याचे सांगण्यात येत आहे. या निर्णयामुळे दिल्लीकडे जाणाऱ्या प्रवाशांमध्ये संभ्रम निर्माण होण्याची शक्यता आहे. प्रवाशांनी प्रवासापूर्वी रेल्वेच्या अधिकृत वेळापत्रकातून गाड्यांची स्थिती तपासण्याचे आवाहन करण्यात येत आहे.



**पुण्यातील विद्यार्थ्यांना ताब्यात घेतल्याचा आरोप-**

दिल्लीतील आंदोलनासाठी निघालेल्या पुण्यातील विद्यार्थ्यांना गुरुवारी रात्री ताब्यात घेण्यात आल्याचा दावा कॉकरोच जनता पार्टीने केला आहे. विद्यार्थ्यांना बसमधून अज्ञात ठिकाणी नेण्यात आल्याचे पक्षाचे म्हणणे आहे. मध्य प्रदेशातील काही तरुणांचा बसमधील व्हिडिओही पक्षाने समाजमाध्यमांवर प्रसारित केला असून, त्यातील एका तरुणाने मध्य प्रदेश पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे. या घटनांबाबत संबंधित यंत्रणांकडून स्वतंत्र अधिकृत पुष्टी मिळालेली नसल्याने आरोपांची पडताळणी होणे आवश्यक आहे.

दिल्ली पोलिसांकडून हॉटेल्स आणि गेस्ट हाऊसमधील नोंदवह्यांची तपासणी केली जात असल्याचे वृत्त आहे. विशेषतः ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान वास्तव्यास असलेल्या पाहुण्यांची ओळखपत्रे आणि नोंदी पडताळल्या जात आहेत. समूहाने आलेले तरुण, एका व्यक्तीच्या नावावर खोली आरक्षित करून दुसऱ्याच व्यक्तीने वास्तव्यास राहिलेली प्रकरणे तसेच संशयास्पद नोंदी यांची चौकशी केली जात असल्याचे सांगण्यात येते. याशिवाय, बस ऑपरेटर, प्रवाशांच्या आरक्षणांची माहिती, रेल्वे स्थानके आणि विमानतळ परिसरातही पोलिसांकडून लक्ष ठेवले जात असल्याचे वृत्त आहे. आंदोलनासाठी मोठ्या संख्येने लोक दिल्लीत दाखल होऊ नयेत, या उद्देशाने ही खबरदारी घेतली जात असल्याचा दावा करण्यात येत आहे. कॉकरोच जनता पार्टीचे अभिजीत दीपके यांनी आंदोलनापूर्वी समाजमाध्यमांवर पोस्ट करत सरकारवर टीका केली आहे. 'सत्ता तुमच्याकडे असू शकते; पण रस्ते आमचे आहेत. इथूनच आम्ही आमची लोकशाही परत मिळवू,' अशा शब्दांत त्यांनी आंदोलनाची भूमिका मांडली.

१० ऑक्टोबरच्या आंदोलनापूर्वी मोठ्या संख्येने कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले जात असल्याचा आरोपही दीपके यांनी केला आहे. लोकांना तुरुंगात टाकून विरोधाचा आवाज दाबता येणार नाही. उलट, जितक्या अधिक लोकांना ताब्यात घेतले जाईल, तितके अधिक लोक आंदोलनात सहभागी होतील, असा दावा त्यांनी केला.

**ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी-** ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीने १० ऑक्टोबर रोजी दिल्लीत आंदोलन करण्याची घोषणा केली आहे. दीपके यांनी २ ऑक्टोबरच्या रात्री 'एक्स'वर पोस्ट करून ज्ञानेश कुमार यांनी राजीनामा न दिल्यास देशभरातून कार्यकर्ते दिल्लीत पोहोचतील, असा इशारा दिला होता.

दिल्ली पोलिसांनी आंदोलकांना जंतर-मंतरपर्यंत पोहोचण्यापासून रोखले, तर जिथे रोखले जाईल, तिथेच जंतर-मंतर उभारले जाईल, अशी आक्रमक भूमिकाही दीपके यांनी मांडली आहे.










दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
आधुनिक उपचार पद्धती
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
कमी वेदना, जलद बरे होणे
लेझर व प्रगत तंत्रज्ञान
अनुभवी जड़ डॉक्टरांचा सल्ला
गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
◆ RNI No. MAHMAR/2007/24252 ◆
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढयान् पिढयांचा
9601222777
9615222777
काळे ज्वेलर्स
सोने
चांदी
हिरे
नवरत्न
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २४५। किंमत - ४ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.)


सिल्क फेस्टीव्हल
स्पर्श रेशमी सुखाचा
महोत्सव
सिल्क वस्त्रांचा
नामांकित ब्रँडस्च्या असंख्य व्हरायटीज्सह!
२० ऑगस्ट २०२६ पासून
मर्यादित कालावधीसाठी
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेंद्र
मेन रोड, संगमनेर.
फोन : ०२४२५-२२५७४०,
७९०१० ३११५५.

## 'विठाबाई'जीवनगौरव पुरस्कार समितीवर पद्मश्री रघुवीर खेडकर, डॉ. संतोष खेडलेकर





युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- तमाशा क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार निवड समितीवर येथील लोककला अभ्यासक डॉ. संतोष खेडलेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागाने आज अध्यादेश जारी करून नवीन समितीची घोषणा केली आहे.

सन २००६ पासून महाराष्ट्र शासनाच्या वतीने तमाशा क्षेत्रात विशेष योगदान देणाऱ्या ज्येष्ठ कलाकाराला विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार दिला जातो. सध्या या पुरस्काराचे स्वरूप दहा लाख रुपये, मानपत्र आणि स्मृतिचिन्ह असे आहे. डॉ. खेडलेकर यांनी यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या तमाशासाठी देण्यात येणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार निवड समिती, महाराष्ट्र शासनाची तमाशा कलावंत तक्रार निवारण समितीवर काम केले आहे. याचबरोबर साहित्य क्षेत्रातील देशातील सर्वोच्च अशा साहित्य अकादमी पुरस्कार निवड समितीवरही काम केले आहे. ८ ऑक्टोबर रोजी काढलेल्या अध्यादेशानुसार राज्याचे सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार हे समितीचे अध्यक्ष तर समिती सदस्यांमध्ये डॉ. संतोष खेडलेकर यांच्यासह पद्मश्री रघुवीर खेडकर, ज्येष्ठ तमाशा कलावती आणि विठाबाई नारायणगावकर यांच्या ज्येष्ठ कन्या मंगला बनसोडे, आतांबर शिरढोणकर, गणेश चंदनशिवे, डॉ. श्यामल गरुड यांचा समावेश आहे.

डॉ. खेडलेकर यांच्या निवडीबद्दल राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, तमाशा परिषदेचे अध्यक्ष संभाजीराव जाधव, खान्देश तमाशा परिषदेचे अध्यक्ष शेषराव गोपाळ, अमृतवाहिनी बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी आदिंनी अभिनंदन केले आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने पद्मश्री खेडकर आणि डॉ. संतोष खेडलेकर यांचे अभिनंदन.

## बोटा ट्रॉमा सेंटरचे काय? मंजुरीनंतरही काम नाही ?



### आणखी किती अपघाताची वाट पहायची?

**महामार्गावरील अपघातानंतर जखमींना योग्य वेळी उपचार मिळणे हे त्यांचे प्राण वाचविण्यासाठी निर्णायक ठरू शकते. ट्रॉमा केअर सेंटर सुरू झाल्यास तालुक्याच्या पठार भागासह पुणे–नाशिक महामार्गावरून प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो. त्यामुळे शासनाने मंजूर प्रकल्पाची सद्यस्थिती स्पष्ट करावी. बांधकाम किती झाले, निधी किती खर्च झाला, वैद्यकीय पदे व उपकरणांची व्यवस्था कधी होणार आणि ट्रॉमा केअर सेवा सुरू करण्याची अपेक्षित तारीख काय आहे, याची माहिती मिळणे आवश्यक आहे. या महामार्गावर काल गुरुवारी देखील मोठा अपघात झाला यात एक तरुणीचा मृत्यू झाला. त्यामुळे आणखी किती अपघाताची वाट पहायची असा प्रश्न पडला आहे.**

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या नागरिकांना तातडीने उपचार मिळावेत, यासाठी संगमनेर तालुक्यातील बोटा येथे ट्रॉमा केअर सेंटर सुरू करण्याची मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी सातत्याने लावून धरली. त्यानंतर आमदार अमोल खताळ यांनीसुध्दा हा मुद्दा विधानसभेत मांडला. आ. तांबे त्यांच्या पाठपुराव्यामुळे बोटा येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यास मंजुरी मिळाली. या प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीसाठीही पाठपुरावा सुरू असताना महामार्गावरील भीषण अपघात आणि त्यानंतर होणारी न्यायालयीन कारवाई यामुळे ट्रॉमा सेंटरची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

डिसेंबर २०२३ मध्ये या महामार्गावरील खंदरमाळवाडी परिसरात वारकऱ्यांच्या दिंडीत कंटेनर घुसल्याने चार वारकऱ्यांचा मृत्यू झाला, तर अनेक वारकरी जखमी झाले. या दुर्घटनेनंतर अपघातग्रस्तांना जवळच तातडीने उपचार मिळावेत, यासाठी महामार्गालगत ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याची मागणी अधिक तीव्र झाली. अपघातानंतर जखमींना उपचारासाठी दूरवर हलवावे लागत असल्याने उपचार मिळण्यास विलंब होऊ शकतो, हा मुद्दा आ. तांबे आणि आ. खताळ यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिला व हा विषय लावून धरला.

आ.तांबे यांच्या मागणीला प्रतिसाद देत ९ मार्च २०२४ रोजी शासनाने बोटा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय व ट्रॉमा केअर सेंटर उभारण्यास विशेष बाब म्हणून मंजुरी दिली. या निर्णयामुळे या महामार्गावरील अपघातग्रस्तांना परिसरातच आपत्कालीन उपचार उपलब्ध होण्याच्या अपेक्षा निर्माण झाल्या. त्यानंतर बोटा येथील ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निविदा प्रक्रियेत १४ फेब्रुवारी २०२५ रोजी सुमारे १९.६९ कोटीची निविदा निघाल्याची नोंद संकेतस्थळावर उपलब्ध आहे. निविदेतील कामाचा कालावधी ७२० दिवस नमूद करण्यात आला आहे. मात्र, या नोंदीवरून प्रत्यक्ष बांधकामाची आजची प्रगती किंवा ट्रॉमा सेवा सुरू झाल्याची स्थिती निश्चित होत नाही. बोटा येथील प्रकल्पाला मंजुरी मिळणे हा महत्त्वाचा टप्पा असला, तरी अपघातग्रस्तांना प्रत्यक्षात तातडीची सेवा मिळण्यासाठी पुढील कामे पूर्ण होणे गरजेचे आहे. इमारतीचे बांधकाम, आवश्यक वैद्यकीय पदांची निर्मिती, तज्ज्ञ डॉक्टर व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची उपलब्धता, आपत्कालीन उपकरणे आणि चोवीस तास उपचार व्यवस्था या बाबी महत्त्वाच्या आहेत. आमदार सत्यजीत तांबे यांनी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला.

## संगमनेरमध्ये वीज गायब; संतप्त नागरिकांचे मध्यरात्री रास्ता रोको !

### उकाडा आणि डासांमुळे नागरिक हैराण

युवावार्ता(प्रतिनिधी)

संगमनेर : संगमनेर शहरासह परिसरात अचानक वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला. पावसाळ्याचे दिवस असतानाही उन्हाळ्यासारखा उकाडा जाणवत असल्याने आणि त्यातच डासांचा उपद्रव वाढल्याने लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य नागरिकांची मोठी गैरसोय झाली. अनेक तास उलटूनही वीजपुरवठा सुरळीत न झाल्याने संतप्त नागरिकांनी मध्यरात्री बारा वाजण्याच्या सुमारास शहरातील तीनबत्ती चौकात अचानक रास्ता रोको आंदोलन करत वीज वितरण कंपनीच्या कारभाराविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.

शहरातील अनेक भागांमध्ये सायंकाळी खंडित झालेला वीजपुरवठा रात्री दहा ते अकरा वाजण्याच्या सुमारास पूर्ववत झाला. मात्र, काही भागांत मध्यरात्रीनंतरही वीज गायब असल्याने नागरिकांच्या अडचणी अधिकच वाढल्या. काही ठिकाणी रात्री एक ते दोन वाजेपर्यंत वीजपुरवठा सुरू न झाल्याने नागरिकांना उकाड्यात रात्र जागून काढावी लागली. घरातील पंखे बंद असल्याने आणि डासांचा त्रास वाढल्याने विशेषतः लहान मुले व वृद्ध नागरिकांना मोठ्या हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.

घुलेवाडी येथील १३२ केव्ही उपकेंद्रात तांत्रिक बिघाड झाल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याची चर्चा नागरिकांमध्ये होती. मात्र, बिघाडाचे नेमके कारण आणि वीजपुरवठा पूर्ववत होण्यास लागलेल्या विलंबाबाबत अधिकृत स्पष्टीकरण समोर आलेले नव्हते. तांत्रिक अडचण निर्माण होणे ही बाब समजण्यासारखी असली, तरी ती दूर करण्यासाठी अनेक तास लागल्याने नागरिकांनी तीव्र संताप व्यक्त केला.



वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्याने नागरिक त्रस्त- तीनबत्ती परिसर, दिल्ली नाका आणि पुणे रोड परिसरात मागील अनेक दिवसांपासून दिवसातून दोन ते तीन वेळा वीजपुरवठा खंडित होत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. वारंवार वीज जाणे, वीजपुरवठा पूर्ववत होण्यास विलंब होणे आणि रात्रीच्या वेळी निर्माण होणारी गैरसोय यामुळे नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे.

वीज ही आजच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज बनली आहे. अशा परिस्थितीत वारंवार होणारे खंडित वीजपुरवठ्याचे प्रकार आणि तक्रारींचे वेळेत निराकरण न झाल्यास नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने तांत्रिक अडचणी तातडीने दूर कराव्यात, वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्यात आणि वारंवार वीज खंडित होण्याच्या प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

### तीनबत्ती चौकात मध्यरात्री आंदोलन

**वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याच्या प्रकारामुळे आधीच त्रस्त असलेल्या नागरिकांचा संयम अखेर सुटला. अनेक तास वीज नसल्याने संतप्त नागरिकांनी रात्री बारा वाजण्याच्या सुमारास तीनबत्ती चौकात एकत्र येत रास्ता रोको आंदोलन केले. अचानक झालेल्या या आंदोलनामुळे नगर रोड आणि पुणे रोडवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या वाहनचालकांसह प्रवाशांनाही याचा मोठा त्रास सहन करावा लागला. परिस्थितीची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. नागरिकांची समजूत काढून वाहतूक सुरळीत करण्याचे प्रयत्न करण्यात आले.**

ADVANCE GOLD - SIP - SCHEME
गोल्ड एसआयपी योजना
गुंतवणूक फायद्याची बचत जास्तीची!
१० महिने रक्कम भरा
आणि
एक महिना बोनस मिळवा!
जमा झालेल्या रकमेच्या मजुरीवर 50% सूट
बुकिंग दिवसाच्या सोन्याच्या भावात खरेदी करा.
नियम व अटी लागू
सोने । चांदी । हिरे
अशोक चौक, संगमनेर
फोन : 02425-225924
मो : 9372012044
OM MAYUR JEWELLERS
ओममयूर ज्वेलर्स
आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
होलसेल बस्ता बांधा मस्त
ऑफर मिळतेय जबरदस्त !
भाग्यवंत १०१ जोडप्यांना चक्क FREE हनिमून टूर
बस्ता बांधायला यायचं हं!
बस्ता बांधायला यायचं हं!
1 डिसेंबर 2025 ते 31 मे 2026
बस्ता खरेदीसाठी स्वतंत्र होलसेल विभाग | डायरेक्ट फॅक्टरी ते ग्राहक
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

PBM
मे.पोपट भगिरथ महाले ज्वेलर्स (सराफ)
भव्य मंगळसूत्र महोत्सव
फक्त आपल्या लाडक्या PBM ज्वेलर्स मध्ये
यामध्ये नवनवीन डिझाईन् आणि
व्हरायटीचे मंगळसूत्र त्याच प्रमाणे
जुन्या 22 कॅरेट सोन्याच्या
एक्सचेंज वर 0% घट
अशोक चौक, गुंडेचा हॉस्पिटल समोर,चावडी जवळ, संगमनेर
7599996999/ 8265036807

Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services